# उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर

जा.क्र. उमपा/आ.का./४६७/२०२१

दिनांक : ३१ डिसेंबर, २०२१

## : आदेश :

**विषय :- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रतिबंध लादणेबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना**

**संदर्भ :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७**

**२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५**

**३) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU-२०२०/C.R.९२/DisM-१, दि. २७ नोव्हेंबर, २०२१**

**४) आदेश क्र.उमपा/आ.का./४४९/२०२१ दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१**

**५) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU-२०२०/C.R.९२/DisM-१, दि. २४ डिसेंबर, २०२१**

**६) आदेश क्र.उमपा/आ.का./४६२/२०२१ दिनांक २७ डिसेंबर, २०२१**

**७) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU-२०२०/C.R.९२/DisM-१, दि. ३० डिसेंबर, २०२१**

ज्या अर्थी, सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झाली आहे. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (COVID-१९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी, वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आले आहे.

ज्या अर्थी, संदर्भिय शासन आदेश क्र. ३ अन्वये आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन शासनाकडून मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अधिकारामध्ये कोविड-१९ विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिरोध (प्रतिबंध) कमी करण्याबाबत शासन मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्याप्रमाणे संदर्भिय आदेश क्र. ४ अन्वये कोविड-१९ विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिरोध (प्रतिबंध) कमी करणेत आले होते. संदर्भ क्र. ५ अन्वये शासनाने अतिरिक्त निर्बंध लादणेबाबत सूचना दिल्या होत्या, त्याप्रमाणे संदर्भ क्र. ६ अन्वये महापालिका क्षेत्रात अतिरिक्त निर्बंध लागू करणेत आले होते.

आणि ज्याअर्थी, **मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजीच्या आदेशात कोविड-१९ विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी राज्य शासनाने निर्बंध अंमलात आणणेबाबत संदर्भ क्र. ७ अन्वये आदेश पारित केलेले आहेत.**

**त्याअर्थी, साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८९७ च्या कलम २ अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या सर्व संबंधित तरतुदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर हे शासनाचे दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजीचे आदेशातील नमुद निर्बंध उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी रात्री १२.०० वाजेपासून तात्काळ प्रभावाने जसेच्या तसे लागु करीत आहे. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.**

तसेच यापूर्वी लागू केलेले निर्बंध देखील लागू राहतील, दरम्यानच्या कालावधीत शासनाकडून अन्य कोणत्याही सूचना/आदेश प्राप्त झाल्यास त्यांचे अनुपालन करणे देखील बंधनकारक असेल.

उक्त आदेशाची सर्व संबंधितांनी तात्काळ अंमलबजावणी करावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० कलम, १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

**सहपत्र :- शासन आदेश क्र. DMU-२०२०/C.R.९२/DisM-१, दि. ३० डिसेंबर, २०२१**

३१/१२/२०२१

**(सुधाकर देशमुख)**
**आयुक्त**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**प्रत-**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
२. मा. पालकमंत्री तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
३. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
४. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग.
५. मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
६. मा. पोलीस आयुक्त, ठाणे.
७. मा.महापौर, मा.उप महापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.सभापती प्रभाग समिती, सर्व गटनेता, सर्व सन्माननीय महापालिका सदस्य यांचेकडे माहितीसाठी.
८. मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती/आरोग्य परिक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती/महसूल समिती/पाणी पुरवठा व मलनिस्सारण समिती/सार्वजनिक बांधकाम समिती/नियोजन व विकास समिती/पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती/गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती/क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती.
९. मा.पोलिस उप आयुक्त, परिमंडळ - ४, उल्हासनगर.
१०. सहाय्यक पोलिस आयुक्त, उल्हासनगर/अंबरनाथ.
११. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, उल्हासनगर/मध्यवर्ती/विठ्ठलवाडी/हिललाईन/शिवाजीनगर पोलिस स्टेशन.
१२. जनसंपर्क अधिकारी, उ.म.पा. यांनी सदर आदेशाची उचित माध्यमांव्दारे जास्तीत जास्त प्रसिध्दी करावी.
१३. अतिरिक्त आयुक्त, उप आयुक्त(मुख्यालय), सर्व उप आयुक्त, सर्व विभागप्रमुख, उल्हासनगर महानगरपालिका.
१४. सर्व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती कार्यालये.
१५. सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 032**
**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, date 30th December, 2021**

**ORDER**

---

**Reference:**

(a). The Epidemic Diseases Act, 1897
(b) The Disaster Management Act, 2005
(c) Home Department – circular RLP-1221/Pra.Kra 280/Visha 1 B dated 23rd December, 2021.
(d) Department of Disaster Management, Relief and Rehabilitation No: DMU/2020/CR. 92/DisM-1, dated 27th November, 2021
(e) Department of Disaster Management, Relief and Rehabilitation No: DMU/2020/CR. 92/DisM-1, dated 24th December, 2021

Whereas the State Government is satisfied that the people of Maharashtra are threatened with the spread of COVID-19 virus especially with the emergence of the Omicron variant, and therefore it is imperative to take certain urgent measures to prevent and contain the spread of the Covid-19 virus, the State Government in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897, read with all other enabling provisions of The Disaster Management Act, 2005, finds it is necessary to amend the order imposed vide reference (e) Department of Disaster Management, Relief and Rehabilitation No: DMU/2020/CR. 92/DisM-1, dated 24th December, 2021 to take the following measures immediately throughout the state to more effectively check the transmission of the Covid-19 virus.

Now, therefore, in exercise of the powers conferred under The Disaster Management Act, 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee, State Disaster Management Authority hereby issues the following directions, that will come into force from 31st December, 2021 from 0000 hrs –

a. In the case of Marriages, whether in enclosed spaces or open to sky spaces, the maximum number of attendees shall be restricted to 50 persons.

b. In case of any gathering or program, whether social, cultural, political or religious, whether in enclosed spaces or open to sky spaces, the maximum number of attendees shall be restricted to 50 persons.

c. In the case of last rites, the maximum number of attendees shall be restricted to 20 persons.

d. In any part of the state which are tourist spots or other places that attract large congregations of people such as beaches, open grounds etc. the Competent Authority concerned, in addition to the restrictions vide (e) Department of Disaster Management, Relief and Rehabilitation No: DMU/2020/CR. 92/DisM-1, dated 24th December, 2021, may as deemed appropriate, impose Section 144 of the Code of Criminal Procedure 1973.

e. All other existing instructions already in place shall continue to be in force till further orders.

BY ORDER AND IN THE NAME OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA

(Debashish Chakrabarty)
Chief Secretary and
Chairperson, State Executive Committee